
18 MAY 2021 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आय विटनेस

# मन प्रफुल्लित करणारा गुलमोहरचा सडा



कोरोनामुळे सगळीकडे नैराश्याचे मळभ दाटून आले असताना शिवाजी विद्यापीठाची मुख्य इमारत ते मानव्यशास्त्र इमारत या मार्गावर गुलमोहरांच्या पाकळ्यांचा हा निसर्गाचा आविष्कार मनाला उभारी देणारा आणि उद्या चांगलं घडणार असा आशावाद पेरणारा आहे. हे छायाचित्र विद्यापीठाचे उद्यान अधीक्षक अभिजित जाधव यांनी सोमवारी मोबाइलच्या कॅमेऱ्यात टिपले.

पुढारी

# एम.फील.,पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना मुदतवाढ देण्याची मागणी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून एम.फील., पीएच.डी. च्या विद्यार्थ्यांना मुदतवाढ देण्यात यावी, या मागणीचे निवेदन करवीर काशी फौंडेशनच्यावतीने कुलगुरु डॉ. डी. टी.शिर्के यांना देण्यात आले.कोरोना संकटामुळे मार्च २०२० पासून संचारबंदी, लॉकडाऊन सुरुच आहे. अद्यापही कोरोनाचे संकट पूर्णपणे टळलेले नाही. यामुळे एम.फील.व पीएच. डी. च्या विद्यार्थ्यांना संशोधन कार्यात अडथळा निर्माण झाला आहे. कोरोना काळातील संशोधक विद्यार्थ्यांच्या फी बाबतीत सहानुभूतीने विचार करून सवलत देण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. निवेदनावर अध्यक्ष सुनिलकुमार सरनाईक, डॉ. रमेशकुमार नांगरे, मिलिंद सावंत, संजय लिंगनूरकर, विजय जाधव, महादेव भोसले, सुनिल जाधव यांच्या सह्या आहेत.

1 8 MAY 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे उद्यापासून 'संशोधन पद्धती'वर ऑनलाईन व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने पदव्युतर व संशोधक विद्यार्थ्यांसाठी संशोधन पद्धती या विषयावर बुधवार, दि. १९ मे पासून पाच दिवसीय ऑनलाईन व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे.

१९ ते २३ मे या कालावधीत ही व्याख्यानमाला चालणार आहे. ऑनलाईन व्याख्यानमालेत 'संशोधन आराखडा तयार करणे' विषयावर डॉ. कृष्णा पाटील, 'संशोधन पेपर तयार करणे' विषयावर डॉ. सचिन सलगर, 'संशोधनात आयसीटीचा वापर' विषयावर डॉ. विद्यानंद खंडागळे, 'संशोधनात एसपीएसएसचा वापर' विषयावर डॉ. सुकुमार राजगुरू व 'संशोधन अहवाल लेखन' विषयावर प्रा. डॉ. ए. एम. गुरव हे मार्गदर्शन करणार आहेत.

पुढारी

संक्षिप्त

# प्रथम वर्ष प्रथम सत्र परीक्षेसाठी ऑनलाईन पर्याय निवडण्याची १८ मेपर्यंत मुदत

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठातर्फे प्रथम वर्ष प्रथम सत्र परीक्षेसाठी ऑनलाईन पर्याय निवडण्याची मुदत १८ मेपर्यंत वाढविण्यात आली आहे. विद्यापीठाच्या वतीने प्रथम वर्ष प्रथम सत्राच्या परीक्षा २५ मेपासून सुरू होणार आहेत. या परीक्षेसाठी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देण्याचा पर्याय निवडून विद्यापीठ संगणक प्रणालीत नोंदविण्यासाठी १६ मेपर्यंत मुदत वाढविण्यात आली होती. दरम्यान, नैसर्गिक आपत्ती व सुरू असणाऱ्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर पर्याय निवडण्याची मुदत १८ मे रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

सकाळ

# संशोधक विद्यार्थ्यासाठी व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे १९ ते २३ मे दरम्यान दररोज दुपारी बारा ते एक या वेळेत पदवीत्तर व संशोधक विद्यार्थ्यासाठी संशोधन पद्धती या विषयावर पाच दिवसीय ऑनलाईन व्याख्यानमाला होत आहे. त्याचा लाभ घ्यावा असे, आवाहन समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले आहे.

सकाळ

# पीएच.डी. एम.फीलला मुदतवाढीची मागणी

कोल्हापूर, ता. १७ : कोरोना संकटामुळे मार्च २०२० पासून संचारबंदी, लॉकडाउन लागू करण्यात आला आहे. यामुळे एम.फील व पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना संशोधन कार्यात अडथळा निर्माण झाला आहे. तरी विद्यार्थ्यांची असहायता व कठीण परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना मुदतवाढ देण्यात यावी. अशी मागणी करवीर काशी फौंडेशन यांनी केली आहे.

याबाबतचे निवेदन त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शर्के यांना ऑनलाईन दिले. निवेदनावर करवीर काशी फौंडेशनचे सुनीलकुमार सरनाईक, डॉ. रमेशकुमार नांगरे, मिलिंद सावंत, संजय लिंगनूरकर, विजय जाधव, महादेव भोसले, सुनील जाधव यांच्या सह्या आहेत.

तरुण भारत

# ऑनलाईन परीक्षा पर्याय मुदतवाढ

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ अंतर्गत एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया उशिरा झाली होती. त्यामुळे पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व रिपीटरच्या ऑनलाईन परीक्षा २५ मेपासून सुरू होणार आहेत. या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज भरला आहे, त्यांना ऑनलाईन परीक्षेचा पर्याय देण्यासाठी १८ मे पर्यंत मुदवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी पत्रकाव्दारे दिली आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या पारंपारिक अभ्यासक्रम एम. ए., एम. कॉम., एम. एस्सीच्या परीक्षा २५ मे पासून सुरू होणार आहेत. या परीक्षेसाठी ऑनलाईन पर्याय देण्यासाठी १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

परंतू कोकणासह कोल्हापूर जिल्हयाला तोक्ते चक्रीवादळाचा तडाखा बसला. यामुळे जोरदार वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाल्या. रेंजमुळे विद्यापीठाचे संकेतस्थळावर अर्ज भरण्यास अडचणी येत होत्या. काही विद्यार्थ्यांना मोबाईल रेंज नसल्याच्या तक्रारी आल्या, याची दखल घेत विद्यापीठाने १८ मे सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक पळसे यांनी केले आहे.